# बालशिक्षण आणि भाषाशिक्षण

साधारणपणे बालकाचे सहा वर्षांपर्यंतचे वय हे बालशिक्षणाचे वय मानण्याचा प्रघात आहे. जगात सगळीकडेच सहा वर्षांनंतरचे वय हे बालकाच्या औपचारिक शिक्षणाचे वय मानले गेले आहे. त्यामुळे औपचारिक शिक्षण सुरू होण्याच्या आधीच्या काळातील, बालकाचे, जे शिक्षण ते बालशिक्षण होय, अशी बालशिक्षणाची व्याख्या करता येईल.

बालकाच्या नैसर्गिक वाढीच्या अंगाने पाहिले तर बालशिक्षणाचे वय हेच बालकाच्या भाषाशिक्षणाचेही प्रधान वय आहे. त्यामुळे नेहमीच बालशिक्षण व भाषाशिक्षण हे बरोबरीने, हातात हात घालून झाले पाहिजे. आपल्या बालशिक्षणाच्या व्यवहाराच्या अंगाने बोलायचे तर असे म्हणता येईल की, भाषाशिक्षण हाच मुळी बालशिक्षणाचा केंद्रीभूत असा भाग आहे. किंवा असेही म्हणता येईल की. भाषाशिक्षण हाच बालशिक्षणाचा प्राण आहे ! आपण असे म्हणतो आहोत याला अर्थातच, काही शास्त्रीय कारणे आहेत.

पहिले कारण असे की, सहा वर्षांपर्यंतच मुले आपल्या परिसरातली, आपल्या घरात सर्रास बोलली जाणारी भाषा सहजपणे आत्मसात करतात. भाषा आत्मसात होणे याचा अर्थ, दुसऱ्यांनी बोललेली भाषा कळणे आणि अशीच दुसऱ्याला कळणारी भाषा आपल्याला बोलता येणे. वेगळया शब्दांत असेही म्हणता येईल की, भाषा आत्मसात होणे म्हणजे भाषा ऐकून कळणे आणि अशी कळलेली भाषा, समजून बोलता येणे. येथे पुन्हा हे लक्षात घ्यायला हवे की ऐकली जाणारी वा बोलली जाणारी भाषा ही नेहमीच शब्दरूप (आणि वाक्यरूप) अशीच असते, आणि प्रत्येक भाषेतील शब्दांना ( आणि वाक्यांना ) निश्चित असा अर्थ असतो. त्यामुळे 'भाषा ऐकून कळणे' असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा, त्याचा अर्थ शब्दार्थ व वाक्यार्थ कळणे असा होतो. तसेच आपण जेव्हा 'भाषा समजून बोलता येणे' असे म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ असा आहे की शब्दार्थ नि वाक्यार्थ नीट समजून वापरता येणे. किंबहुना असे झाले तरच आपण बोललेली भाषा दुसऱ्यास कळते आणि दुसऱ्याने बोललेली भाषा आपल्याला कळते. आता आपण असे म्हणू शकतो की सहा वर्षांपर्यंतचे बालकाचे वय हे अर्थपूर्णतेने भाषा आत्मसात करण्याचे वय आहे.

दुसरे शास्त्रीय कारण जरा खोलवरचे आहे, आणि तरीही ते आपण, विशेषतः बालशिक्षणातल्या लोकांनी समजावून घेतले पाहिजे, कारण त्यावरून आपला लहान बालकांशी होणारा भाषिक व्यवहार ठरणार आहे.

आपला बौद्धिक, भावनिक, सामाजिक इत्यादी म्हणजे सर्वप्रकारचा व्यवहार हा आपल्या मेंदूकडून ठरविला जातो आणि पार पाडला जातो. भाषिक व्यवहार हा सुद्धा, काही प्रमाणात निसर्गाने ठरवून दिलेला व काही प्रमाणात समाजाकडून ठरवून दिलेला असा आपला व्यवहार आहे. भाषा ही मूलतः मानवाने सामाजिक संपर्कासाठी म्हणून निर्माण केली व पुढे विकसित केली असली तरी तिने, मागील शेकडो वर्षांच्या अवधीत माणसाच्या मेंदूमध्ये स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळेच माणसाला भाषा ऐकून समजते, बोलता येते किंवा लिहिता-वाचताही येते. त्यामुळे, जर, लहान वयात मुलांना भाषेमध्ये तरबेज करण्याचे काम त्यांचा मेंदू करीत असेल तर भाषानिर्मितीसाठी त्यांच्या मेंदूची काळजी घेणे, तसेच त्यांच्या मेंदूला भाषा शिक्षणासाठी सहाय्य

करण्याचे काम, प्रौढांना करावे लागते. म्हणून बालशिक्षणात कार्य करीत असलेल्या सर्व प्रौढांनी भाषेत तरबेज होण्यासाठी बालकांना भाषिक अनुभवांचे पुरेसे खाद्य पुरवायचे असते.

तिसरे शास्त्रीय कारण असे आहे की, बालवय हाच भाषाशिक्षणाचा वेगवान आणि सर्वोत्तम असा काळ असतो. बालवय आणि भाषा शिकणे यांचा असा संबंध आहे. बालवयात भाषा अतिशय वेगाने आत्मसात केली जाते हे जेवढे खरे आहे तेवढेच या वयात भाषा शिकण्याची संधीच मिळाली नाही तर, म्हणजे हा काळ भाषिक ऐकण्या-बोलण्याच्या संधीशिवाय तसाच निघून गेला तर, पुढील मोठ्या वयात भाषा आत्मसात करणे दुरापास्त असते. भाषा येणे कठीण होते. याचा अर्थ असा की भाषा शिकायची तर ती बालवयातच शिकणे शक्य असते, आणि योग्य असते. भाषा ही अशी बालवयाशी जोडूनच येत असते, हे आपण सर्वांनी कायमच लक्षात ठेवले पाहिजे.

बालशिक्षण आणि भाषाशिक्षण यांचा परस्परसंबंध बांधून दाखविणारी ही शास्त्रीय कारणे विचारात घेतली तर हा संबंध उत्तम त-हेने जोपासला कसा जाईल, तो अधिक उपयुक्त, अधिक उत्पादक कसा करता येईल याकडे आपण जाणतेपणाने वळ शक

काय केले पाहिजे मुलांचे भाषा शिक्षण चांगले होण्यासाठी ?

पहिली गोष्ट म्हणजे पालकांनी, शिक्षकांनी आणि संस्थाचालकांनी एकत्र येऊन बालकांच्या भाषाशिक्षणाचा विकासपथ तयार केला पाहिजेः विकासपथ म्हणजे भाषा विकसित होत जाण्याचा, बालकांच्या वयोमानानुसार मार्ग आखणे व त्यावरील टप्पे व त्या प्रत्येक टप्प्यांनुसार नैसर्गिकरित्या भाषेचे शिक्षण कसकसे होत जाते ते समजावून घेणे. येथे आपण सहा वर्षांपर्यंतचा मुलांचा भाषा आत्मसात होण्याचा कालावधी विचारात घेत आहोत. या कालावधीचे, साधारणपणे, तीन टप्पे करता येतील. एक, जन्माला आल्यापासून दीड वर्षांपर्यंतचा कालावधी. दोन, दीड वर्षांपासून तीन वर्षांपर्यंतचा कालावधी, आणि तीन, तीन ते सहा या वयाचा कालावधी.

**भाषाशिक्षण : टप्पा एक**

या कालावधीला आपण, 'बोलता येण्यापूर्वीचा, बालकाचा, भाषा आकलनाचा कालावधी' असे नाव देऊ या. मुले भाषा बोलायला शिकण्यापूर्वी, भाषा समजू लागतात. ही क्रिया अगदी वयाच्या सहाव्या महिन्यापासून सुरू होते. घरात, मुख्यतः आई-वडिलांकडून, त्यातही अधिक प्रमाणात आईकडून ऐकली जाणारी भाषा, मुले समजून घ्यायला लागतात. भाषा समजावून घेणे याचा अर्थ, शब्दाचा होणारा उच्चार व त्याने व्यक्त केलेला अर्थ याचा परस्पर संबंध बांधून तो मेंदूत पक्का करणे, व कायमचा साठवणे. हे काम करण्यासाठी लागणारी तयारी मेंदूमध्ये आपोआपच होत जाते. या काळात भाषा आकलनाचे केंद्र मेंदूमध्ये तयार होत जाते.

या वयातील मुलांचे (त्यांच्या मेंदूचे) सामर्थ्य असे असते या काळात जगातील कोणतीही भाषा मुले आत्मसात करू शकतात. कोणत्याही भाषेतील कोणतेही उच्चार लक्षात ठेवण्याचे सामर्थ्य बालकाच्या मेंदूमध्ये असते. मात्र मुले, जी भाषा त्यांच्या समोर, इतरांच्या बोलण्यातून येते तीच भाषा फक्त मुले आत्मसात करतात. ही त्यांची भाषाशिक्षणाची मर्यादाही आपण लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे घरात सतत बोलली जाणारी, परिसरात सतत ऐकू येणारी भाषा हीच मुलांची पहिली भाषा ठरते, आपण तिला 'मातृभाषा असेही म्हणतो.

**भाषाशिक्षण : टप्पा दोन**

बालकांच्या भाषाशिक्षणाच्या विकासपथावरील दुसरा टप्पा आहे तो, वय वर्षे दीड ते तीन असा. या वयाला आपण 'भाषा बोलता येण्याचा कालावधी' असे नाव देऊ या. या वयात, पहिल्या टप्प्यात सुरू झालेले भाषेचे आकलन तर चालूच असते, पण त्याचबरोबर आणखी एक आश्चर्यकारक घटना घडते. मुले बोलायला लागतात. ही गोष्ट कसकशी घडत जाते याचा अनुभव, ज्यांच्या घरात किंवा आजूबाजूला या वयाची मुले आहेत त्यांनी जाणतेपणाने व आवर्जून घेतला पहिजे. जमले तर त्यांच्या दैनंदिन नोंदीही ठेवल्या पहिजेत. मुलांना भाषा बोलता येणे ही केवळ एका बालकाच्या बाबतीतच नव्हे तर संपूर्ण मानवी जीवनातील क्रांतिकारक घटना आहे. यातील नैसर्गिकता अनुभवणे ही अत्यंत आनंददायक घटना आहे.

या टप्प्यात, एकीकडे, मुले भाषा समजावून घेण्याचे कार्य अधिक जोमाने, अधिक वेगाने करू लागतात. त्यांचा समजावून घेतलेल्या शब्दांचा खूप मोठा संग्रह मेंदूमधील आठवणीच्या कोषात साठविला जातो. तर दुसरीकडे मुले भाषा बोलू लागतात. प्रथमतः तोंडाने कूः कूः असा आवाज काढणे, मग एक एक शब्द उच्चारणे, मग दोन शब्दांचे वाक्य बोलता येणे व त्यानंतर छोटी व मग मोठी वाक्ये अशाप्रकारे मुले बोलायला शिकतात. साधारणपणे वयाच्या तिसऱ्या वयापर्यंत मुले केवळ ऐकलेलीच नव्हे तर न ऐकलेली वाक्येही स्वतः तयार करून सहजपणे बोलू लागतात.

मुलांना अशाप्रकारे भाषा बोलता येते कारण, या काळात, मुलांचे मेंदूमधील भाषा बोलण्याचे केंद्र विकसित होत जाते आणि त्याचबरोबर, त्यांच्या तोंडामधील व घशांमधील भाषा बोलण्यासाठी उपयुक्त असे अवयव, असे स्नायूही तयार होतात.

**भाषाशिक्षण : टप्पा तीन**

बालकाच्या भाषाशिक्षणातील हा टप्पा वय वर्षे तीन ते सहा असा आपण मानलेला असून तो प्रत्यक्षपणे आपल्या बालशाळांमधील बालकांच्या वयोगटाशी जोडलेला आहे. म्हणूनही तो आपल्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

मुलांच्या भाषाशिक्षणाच्या विकासपथावरील पहिल्या दोन टप्प्यांमध्ये घडून येणाऱ्या घटना, म्हणजे, भाषा ऐकून समजावून घेणे आणि भाषा बोलणे या दोन्ही गोष्टी या टप्प्यातही वेगाने पुढे जात असतात. पण आणखी एक गोष्ट अधिक ठळकपणे घडून येते ती म्हणजे जे जे आपल्याला समजते आहे ते ते मुले बोलून पाहतात. त्यामुळे या टप्प्याचे वर्णन आपण 'समजून बोलण्याचा टप्पा' असे करू शकतो.

येथे आपण थोडी आपल्या मुद्यांची उजळणी करू या. पहिल्या टप्प्यात मुले भाषा ऐकून ती समजावून घेण्याचे कार्य करतात. दुसऱ्या टप्प्यात मुले भाषा बोलायला लागतात. आणि या तिसऱ्या टप्प्यात, या दोन क्रियांचे एकत्रीकरण होऊन मुले समजून बोलायला लागतात. म्हणजे येथे मुलांचे बोलणे केवळ अनुकरणात्मक नसते तर ते आकलनयुक्त असते. मुले स्वतःच्या मनातला अर्थ बोलण्याद्वारे व्यक्त करू लागतात. येथे बालकाच्या भाषा शिक्षणातील दुसरी क्रांती घडून येते. मुलांना आपले सर्वच प्रकारचे अनुभव भाषेद्वारे व्यक्त करता येऊ लागतात. भाषाभिव्यक्तीची ही दणकट सुरुवात असते. या घटनेचे परिणाम लक्षात घेतले तर, याला, 'भाषा शिक्षणातील क्रांती' असे का म्हणावयाचे ते लक्षात येईल.

एक, आपल्याला जे काही म्हणायचे आहे ते बोलून व्यक्त करता येते हे मुलांच्या लक्षात येऊ लागले की मुलांचा आत्मसन्मान वाढू लागतो. मुलांना 'स्व' त्व गवसते. आपण काय काय करू शकतो याकडे मुलांचे लक्ष केंद्रित होते, मुलांचा आत्मविश्वास वाढीस लागतो. यातून मुले अधिकाधिक व्यक्त होण्याचा प्रयत्न करतात.

दोन, याच वयात मुले विचार करायला आणि तो भाषेद्वारे व्यक्त करायला लागतात. येथे भाषा हे विचाराचे दुहेरी साधन ठरते. मुले भाषेकरवी विचार करतात आणि विचारांना भाषारूप देऊन तो व्यक्तही करतात. त्यामुळे, या वयात मुलांना या दोन्हींसाठी भरपूर संधी घरांमधून आणि बालशाळांमधून मिळाव्या लागतात.

तीन, याच वयात मुलांना, अमूर्त पातळीवरील कल्पना करता येऊ लागतात. हळूहळू या क्षमतेतूनच मुले आपले स्वतःचे स्वतंत्र असे कल्पनांचे विश्वही बांधू लागतात. पुढे लिहिता-वाचता येऊ लागले की, याद्वारेच मुले निबंध, गोष्टी, कविता यांच्या लेखनाकडे म्हणजे वाङ्मयाकडे - वाङ्मय रसपूर्णतेने वाचणे व त्याचा आस्वाद घेणे आणि आपल्या विचार- कल्पनांना लिखित रूप देणे -वळू शकतात.

चार, समजून, ठरवून, विचार करून भाषा बोलता आली की, आणखी एक महत्त्वाचा नि मुलांच्या बाबतीत आयुष्यभरचा परिणाम घडून येतो. तो म्हणजे, मुले अधिकाधिक प्रमाणात सामाजिक होऊ लागतात. अर्थात् या वयातील सामाजिकता ही मुख्यतः व्यक्तिकेंद्रित, स्वकेंद्रित अशी सामाजिकता असते. म्हणजे असे की, मूल स्वतःला केंद्रस्थानी ठेवून समाजाचा विचार करायला, संपर्क साधायला, मैत्री करायला, इतरांचा उपयोग करवून घ्यायला लागतात. हळूहळू त्यांचा सामाजिक संपर्काचा परिसर वाढू लागतो, आणि त्यासाठी नेमकी प्रौढांची मदत त्याला लागते. मुलांचा अधिक आणि वेगवेगळ्या वयांच्या, वेगवेगळ्या समाजगटांतल्या लोकांशी वाढता संपर्क ठेवल्याने मुलांची भाषाही प्रगल्भ होत जाते. थोडक्यात असे की. या वयात, मुलांची भाषेकरवी सामाजिकता वाढते आणि सामाजिक संपर्कातून भाषा विकसीत होत जाते.

**बालशाळेतील भाषाशिक्षण**

हे सारे, या वयातील भाषाशिक्षणाचे परिणाम लक्षात घेतले तर बालवयातील, बालशाळेतील भाषाशिक्षण किती अत्यावश्यक आणि महत्त्वाचे आहे हे लक्षात येईल.

मुलांच्या भाषाशिक्षणाची जबाबदारी ही फक्त शाळांची नाही, तर ती शाळा व घर अशी दोन्हींची मिळून आहे. शाळेच्या संदर्भात बोलायचे तर ती फक्त बालशाळेची नाही तर ती बालशाळा व प्राथमिक शाळा अशा दोन्ही संस्थांची आहे. त्यांच्यात विभागणीही आहे. प्रत्यक्ष लिहिण्या-वाचण्याच्या कामाची सुरुवात करणे व विकास करणे ही जबाबदारी केवळ प्राथमिक शाळांची आहे. या लिहिण्या-वाचण्याच्या कौशल्य प्राप्तीसाठी शारीरिक तयारी करावयाचे काम हे बालशाळेने करून ठेवायचे आहे. त्यासाठी अक्षरशः शेकडो उपक्रम व साधने निर्माण झाली आहेत. त्यांचा रास्त उपयोग बालशाळांनी करून लिहिण्या-वाचण्याच्या उंबरठ्यापाशी मुलांना, शारीरिक व मानसिकदृष्ट्या आणून ठेवायचे आहे. फक्त तेवढेच आणि तेवढेच करायचे आहे. प्रत्यक्ष लिहायला-वाचायला मुलांना अजिबात शिकवायचे नाही, तसे केले तर त्याचे मुलांच्या बुद्धीवर मोठे ओझे पडून मुलांवर अन्याय केला जातो. बालशाळेत मुलांची पुढील काळातील भाषा शिकण्यासाठी शारीरिक व मानसिक तयारी नेमकेपणाने कशी करायची हे मात्र सांगता येईल.

**भाषानुभवांतून क्षमताविकास**

बालशाळेमधील सर्व शिक्षण हे नेहमी मुलांना विविध त-हेचे अनुभव देण्याचेच असते. अनुभवांतूनच मुलांच्या पुढील काळात मिळवायच्या ज्ञानाच्या नि कौशल्यांच्या क्षमता वाढत असतात. त्यामुळे, बालशाळेत केवळ अनुभव देण्याचेच काम शिक्षिकांनी करायचे असते. अर्थात् भाषाशिक्षणासाठी भाषिक अनुभव द्यायचे असतात.

बालशाळेच्या भाषेच्या संदर्भात जी जबाबदारी असते ती भाषिक क्षमता वाढविण्याची. त्यासाठी पुस्तके लागत नाहीत. जी शाळा मुलांसाठी पुस्तके नेमते ती शाळा वाईट असते असे खुशाल समजावे. क्षमताविकासासाठी वेगवेगळे उपक्रम आणि विविध शैक्षणिक साधने मात्र असावी लागतात.

मुलांच्या भाषिक क्षमता वाढाव्यात यासाठी द्यावयाच्या अनुभवांची विचारपूर्वक निवड करावी लागते. तसेच प्रत्येक क्षमतेसाठीचे अनुभव वेगळे असतील याचीही काळजी घ्यायची असते. शिवाय एकेका क्षमतेसाठी भरपूर अनुभव द्यावे लागतात, सातत्याने द्यावे लागतात, तरच क्षमताविकास चांगला होतो.

मुलांच्या तीन त-हेच्या क्षमता वाढविण्याची जबाबदारी बालशाळेने घ्यायची असते. एक, श्रवणक्षमता, दोन, भाषणक्षमता आणि तीन, संभाषणक्षमता. शिक्षिकांनी या तीन प्रकारच्या क्षमतांच्या विकासासाठी भरपूर अनुभव तयार ठेवायचे असतात, कारण, 'अनुभव देते ती बालशाळा' अशीच मुळी बालशाळेची शास्त्रीय व्याख्या होऊ शकते.

श्रवणक्षमतेचा विकास म्हणजे भाषा नीटपणे ऐकता येणे. म्हणजेच दुसऱ्याने बोललेले शांत राहून ऐकता येणे, आणि मुख्य म्हणजे ऐकलेले समजणे. हे घडायचे असेल तर मुलांना घरी आणि बालशाळेत भरपूर आणि विविध प्रकारांनी भाषा ऐकायला मिळाली पाहिजे. भाषा ऐकण्याने मुलांचा शब्दसंग्रह वाढतो, भाषिक समज वाढते आणि मुख्य म्हणजे अशा ऐकण्यातूनच भाषा बोलण्याची क्षमताही वृद्धिंगत होते.

मुलांची भाषणक्षमता म्हणजे बोलण्याची क्षमता वाढण्याची खूप मोठी संधी म्हणजेच हे लहान वय होय. या वयात मुले आपणहून म्हणजे स्वयंप्रेरणेने बोलायला लागतात, त्यांना सतत बोलावेसे वाटते. आपल्या दैनंदिन आयुष्यात जे जे घडते ते ते कुणाला तरी सांगावेसे वाटत असते. त्यांना सारखे प्रश्न पडत असतात, त्यांची उत्तरे त्यांना इतरांकडून शोधायची असतात. त्यांना सारखे नवे नवे काही आकर्षित करत असते, नवनवे सुचत असते आणि हे सगळे कुणापुढे तरी व्यक्त करण्याची आस त्यांना असते. या सगळया कारणांमुळे स्वभावतःच मुले बडबडी असतात. ज्या घरांमधून आणि बालशाळांमधून मुलांना बोलू दिले जाते, भरपूर बोलू दिले जाते अशा ठिकाणच्या मुलांचा बुध्यंक मोठा असतो याउलट ज्यांना या वयात भरपूर बोलण्याच्या संधी मिळत नाही अशा मुलांचा बुध्यंक कमी राहत असतो असे अभ्यासांतून आढळून आले आहे. यावरून घरांनी आणि शाळांनी योग्य तो धडा घ्यायला हवा.

भाषणक्षमता ही मुलांना उपजतच अवगत असते, परंतु, संभाषणकला मात्र जाणून बुजून विकसित करावी लागते. बोलता येते म्हणजे संभाषण करता येते, असे नाही. नुसती बडबडी मुले संभाषणही चांगले करतीलच असेही नाही. दोन व्यक्तींमध्ये जेव्हा संभाषण होत असते तेव्हा अनेक अशा क्रिया त्यात असतात की ज्या केवळ बोलण्यात, नुसत्या बोलण्यात नसतात. त्यामुळे मुलांच्या बाबतीत त्यांचे इतरांशी संभाषण जाणीवपूर्वक घडवून आणावे लागते. संभाषण करताना, ते करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतींत तीन क्रिया घडून याव्या लागतात. एक म्हणजे दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, दुसरे असे की, जे ऐकले जात आहे ते त्याचवेळी

समजावून घेणे, आणि तिसरे म्हणजे, त्याला योग्य तो प्रतिसाद देणे. थोडक्यात, संभाषण म्हणजे दुसऱ्याचे ऐकणे, ते कळणे, त्याला स्वतः बोलून प्रतिसाद देणे. या तिन्ही गोष्टी परस्परांमध्ये घडत जाणे म्हणजे त्यांच्यात संभाषण चालू असणे होय. मुलांना घरी व शाळेमधून ठरवून अशा संभाषणांच्या संधी द्याव्या लागतात.

___ संभाषण करण्याचा दुहेरी उपयोग आहे. एक म्हणजे, त्याने भाषेचे आकलन वाढते किंवा भाषा सुधारते, आणि दुसरे म्हणजे, त्याने इतर व्यक्तींशी संपर्क वाढून, त्यातूनच व्यक्तीची सामाजिकता वाढू लागते. अशात-हेची सामाजिकता निर्माण होण्याचे आणि ती वाढीस लागण्याचे चांगले वय म्हणजे बालवय किंवा बालशिक्षणाचे वय होय, हे कायम ध्यानात ठेवले पाहिजे.

बालशिक्षणाचे वय म्हणजेच भाषाशिक्षणाचे प्रभावी वय असे जेव्हा आपण म्हणतो आहोत तेव्हा आपण असे म्हणतो आहोत की, पुढील आयुष्याची सर्वतोपरी पायाभरणी करणाऱ्या, श्रवण, भाषण व संभाषण या तीन क्षमतांच्या विकासाचे ते वय आहे. आणि बालशाळांतील मुलांचा असा विकास साधणे हेच बालशाळांचे प्रमुख काम आहे.

मुलांनी भरपूर ऐकले पाहिजे, भरपूर बोलले-बडबडले पाहिजे आणि इतरांशी संपर्क साधून भरपूर हितगुज केले पाहिजे. यातूनच मुलांचे भावी भाषाजीवन घडत जाते !

___ अशात-हेने भाषा शिक्षणाचे शास्त्र विचारांत घेऊनच आपण आपल्या बालशाळांतून मुलांना भाषा शिकण्याच्या उत्तम संधी देऊ या !

(दि. ४-५-६ नोव्हेंबर २०११ या दिवशी धुळे येथे भरलेल्या महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या वार्षिक अधिवेशनातील भाषण)

❖